जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ७१७ दिनांक - २२/०९/२०२३**

भारती विदयापीठ पोलीस स्टेशन, पुणे शहर

## गणेशोत्सवामध्ये गावठी कट्टा व तीन जिवंत काडतुसे बाळगणारा आरोपीस केले जेरबंद

दिनांक २१/०९/२०२३ रोजी भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनचे तपास पथकाचे अधिकारी व अमंलदार वरीष्ठ पोलीस निरीक्षक,विनायक गायकवाड यांचे मार्गदर्शनाखाली गणेशात्सवाच्या अनुषंगाने पेट्रोलींग करीत असताना,पोलीस अंमलदार, मंगेश पवार व निलेश खैरमोडे यांना त्यांचे गुप्त बातमीदाराचे मार्फतीने एक इसम कात्रज घाटातील भिलारेवाडी,पुणे येथील पेट्रोल पंपाच्या समोरील बाजुस पिस्टल कमरेला लावुन थांबला आहे अशी खात्रीशीर बातमी मिळाली.

सदर बातमीचे अनुशंगाने भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनचे तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी भिलारेवाडी येथील पेट्रोल पंपाच्या पुढील बाजुचे शंभु शंकर मिसळ हाऊस हॉटेल समोरील कात्रज घाटाचे चढाचे रोडवर येवुन पाहता,तेथे बातमीप्रमाणे इसम नामे **सतिश गुलाबराव शेरके,वय २३ वर्ष,रा.सध्या शिंदेवाडी,शिरवळ,ता.खंडाळा,जि.सातारा,मुळगाव-मु.गोहजर,पो सारंग बिहारी,तहसील मोखेड,जि.छिंदवाडा,मध्य प्रदेश** हा त्याचे ताब्यात एक ४०,०००/- रुपये किंमतीचे गावठी बनावटीचे पिस्टल व ६००/- रुपये किंमतीचे ०३ जिवंत काडतुसांसह मिळुन आल्याने ते आरोपी कडुन जप्त करण्यात आले असुन,त्याचेविरुध्द **भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं.६०४/२०२३,भारतीय हत्याराचा अधिनियम कलम ३ सह २५ महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)(३)१३५** अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन त्यास नमुद गुन्हयात अटक केली आहे.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुकत,पश्चिम प्रादेशीक विभाग,पुणे,श्री.प्रविणकुमार पाटील, मा.पोलीस उप आयुक्त परिमंडळ-०२,श्रीमती.स्मार्तना पाटील मा.सहाय्यक पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग,पुणे,श्री.नारायण शिरगावकर यांचे मार्गदर्शनाखाली भारती विदयापीठ पोलीस स्टेशन कडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.विनायक गायकवाड, पोलीस निरीक्षक,(गुन्हे),श्री.विजय पुराणिक, गिरीश दिघावकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक,अमोल रसाळ, पोलीस उपनिरीक्षक,धिरज गुप्ता, पोलीस अंमलदार, मंगेश पवार, निलेश खैरमोडे, सचिन सरपाले, चेतन गोरे, महेश बारावकर, शैलेश साठे, निलेश ढमढेरे, अवधतु जमदाडे, अभिजीत जाधव, धनाजी धोत्रे, सचिन गाडे, हर्षल शिंदे, आशिष गायकवाड, अभिनय चौधरी, राहुल तांबे, विक्रम सावंत यांच्या पथकाने केली आहे.


पुणे शहर पोलीस आयुक्तालय अंतर्गत
महाराष्ट्र पोलीस
भारती विद्यापीठ पोलीस ठाणे, पुणे
पुणे पोलीस
दुरध्वनी क्रमांक: ०२०-२४३६५१००
भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन
पुणे शहर